# वालचंद इन्स्टिट्यूटमध्ये ४९५ जणांचे रक्तदान; तरुणींचाही उत्स्फूर्त प्रतिसाद

## भाऊसाहेब गांधी जयंतीनिमित्त शिबिर

प्रतिनिधी | सोलापूर

(कै.) भाऊसाहेब गांधी यांच्या जयंतीनिमित्त वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे रक्तदान शिबिर घेण्यात आले. त्यात ४९५ जणांनी रक्तदान केले. विशेष म्हणजे यात विद्यार्थिनींची संख्या लक्षणीय होती.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विविध उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून हे शिबिर झाले. विद्यापीठाच्या एनएसएसचे समन्वयक डॉ. बी. एन. कांबळे यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या प्रांगणात शिबिराचे उद्घाटन झाले. (कै.) भाऊसाहेब गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संस्थेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, खजिनदार भूषण शहा, पराग शहा, प्राचार्य शशिकांत हलकुडे, कार्यक्रम अधिकारी प्रा. महेश महंत, प्रा. दिलीप दोशी, डॉ. सुलभा आपटे, प्रा. एस. एस. पाटील, डॉ. सचिन गेंगजे, डॉ. शंतनू दीक्षित, प्रा. लुईस लोबो उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, श्रीमती गोपाबाई दमाणी ब्लड बँक, डॉ. हेडगेवार रक्तपेढी, अश्विनी ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचा रक्तसंकलनासाठी सहभाग राहिला. रचित शहा यांनी सूत्रसंचालन केले.




वालचंद अभियांत्रिकीत रक्तदान शिबिराचे उद्घाटन डॉ. बी. एन. कांबळे यांनी केले.